चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२२ जुन, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# वाहतुकीबाबत अधिसुचना

चंद्रपुर—दाताळा रोडला जोडणाऱ्या पुलाचे काम चालु असुन सद्यस्थितीत पुलाच्या बाजुने नविन रस्ता तयार करुन वाहतुक सुरु आहे. भविष्यात पावसाळयातील पुरामुळे केव्हाही सदरचा रस्ता बंद पडु शकतो त्यामुळे जनतेला त्रास व असुविधा होवु नये याकरीता पर्यायी मार्ग खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

वाहतुकीदरम्यान जनतेला धोका, अडथळा किंवा गैरसोय होवु नये तसेच कोणत्याही प्रकारचा अपघात होवु नये व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता दाताळा—चंद्रपूर मार्ग पावसाच्या पुरामुळे बंद पडल्यास **दाताळाकडुन चंद्रपूरकडे जाणारी वाहतुक आयटीआय चौक दाताळा येथुन कोसारा फाटा ते नागपुर रोडने चंद्रपूर कडे जाणाऱ्या मार्गाचा वापर करावा किंवा देवाडा—हिंगनाळा ते पठापनुरा गेट या मार्गाचा (हलकी वाहने) चंद्रपुर शहरात येण्यास वापर करावा असे** जनतेला निर्देश देण्यात आले आहेत.

**सदर अधिसूचना निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन रस्त्याचे काम पुर्ण होईपर्यंत अंमलात राहील तसेच** परिस्थितीनुसार वरील निर्देशात बदल करण्यात येईल व वरिल निर्देशांचे पालन करुन प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

---